साप्रवि/गट-८(र. व का.)/सा. आ./
११७ (क) /म. भत्ता/न. क्र. ५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
प्लॉट क्र. १, तळ मजला, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

**सुधारपत्र क्रमांक २४ दिनांक १६/१०/१९९७**
**(सर्वसाधारण आदेश क्र. ११७ (क) दिनांक ३१ मार्च, १९८६ करिता)**

विषय :- महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या कर्मचाऱ्यांना दि. १ जुलै, १९९७ पासून पुढे द्यावयाच्या महागाई भत्त्याचे सुधारित दर.

संदर्भ :- सर्वसाधारण आदेश क्र. ११७ (क) दि. ३१ मार्च, १९८६ चे सुधारपत्र क्र. २३ दिनांक १५/०५/१९९७

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय एफ. डी. क्रमांक मभत्ता-१११७/२८/सेवा-१०, दिनांक १३ ऑक्टोबर, १९९७ अन्वये दिनांक १ जुलै, १९९७ पासून शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ शासनाच्या आदेशांचे अनुसरण करीत असल्यामुळे मंडळ ठराव क्र. ६६० दिनांक १८ जुलै, १९८७ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात अध्यक्षांनी सदस्य ( प्रशासन )/सचिव, तांत्रिक सदस्य आणि लेखा सदस्य यांच्याशी विचारविनिमय करून खाली निर्देशिलेल्या महागाई भत्त्याच्या सुधारित दरांस मान्यता दिली आहे.

| सुधारित महागाई भत्ता लागू झाल्याची तारीख | सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन | महागाई भत्त्याचे मासिक सुधारित दर |
|---|---|---|
| १ जुलै, १९९७ | १ ) रु. ३,५००/-पर्यंत | १८२ टक्के |
| | २ ) रु. ३,५०१/- ते रु. ६,०००/- पर्यंत | मूळ वेतनाच्या १३७ टक्के परंतु किमान रु. ६३७०/- |
| | ३ ) रु. ६,०००/- हून अधिक. | मूळ वेतनाच्या ११८ टक्के परंतु किमान रु. ८२२०/- |

२) दि. १ जुलै, १९९७ पासून पुढे सुधारित दराने लागू होणाऱ्या महागाई भत्त्याच्या रकमेची गणना करताना सुधारित वेतनश्रेणीतील केवळ मूळ वेतन हिशोबात घ्यावे. 'वेतन' अशी व्याख्या करण्यात येणारे विशेष वेतन, प्रतिनियुक्ती भत्ता, विशेष पूरक भत्ता, हेवी डयूटी भत्ता (अवजड वाहन भत्ता) इत्यादी भत्ते महागाई भत्त्याचा विचार करताना हिशोबात धरु नयेत.

३) महागाई भत्त्याच्या रकमेचे प्रदान करताना ५० पैसे किंवा त्याहून अधिक पैशात येणारी रक्कम पुढच्या रुपयाशी पुर्णांकित करण्यात यावी व ५० पैशांहून कमी करणारी रक्कम दुर्लक्षित करावी.

४) उपदान, अतिकालीक भत्ता, सर्वसाधारण आदेश क्र. ५९ (क) दिनांक २७ जून, १९७७ च्या तरतूदीअंतर्गत रजेचे रोखीकरण, सेवाविनियम क्र. ३९(क), आणि सर्वसाधारण आदेश क्रमांक ११४ (क) दिनांक २३ ऑगस्ट, १९८२ च्या प्रयोजनास्तव, तसेच वेतन व महागाई भत्त्यावर अवलंबून असलेले अन्य कोणतेही प्रदान/वसुली या प्रयोजनास्तव या सुधारपत्राद्वारे लागू होणारा सुधारित दराचा महागाई भत्ता विचारात घ्यावा.

५) सुधारित दरानुसार महागाई भत्त्याचे प्रदान मंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर, १९९७ च्या वेतनापासून सुरु करावे.

६) आणखी असे की, महागाई भत्त्यामध्ये झालेल्या वाढीमुळे १ जुलै, १९९७ ते ३० सप्टेंबर १९९७ पर्यंत ३ महिन्यांची देय थकबाकीची रक्कम कर्मचाऱ्यांना ऑक्टोबर, १९९७ च्या वेतना बरोबर रोख स्वरुपात देण्यात यावी.

७) १ जुलै, १९९७ रोजी किंवा त्यानंतर एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना १ जुलै, १९९७ पासून जुन्या कार्यालयातून मुक्त केल्याच्या तारखेपर्यंतची सुधारित दराने द्यावयाची महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम देताना १ ऑक्टोबर, १९९७ रोजी ते ज्या कार्यालयात काम करीत आहेत त्या कार्यालयाने द्यावी. १ ऑक्टोबर, १९९७ पूर्वी बदलीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता कार्यमुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची थकबाकी बदली झालेल्या ठिकाणी देण्यात यावी.

हे आदेश कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनाही लागू होतील.

(गुरुकीरत गिल)
सदस्य (प्रशासन)/सचिव

प्रत,

१) मुख्य कार्यालयातील सर्व कक्ष प्रमुख.

२) क्षेत्रीय कार्यालयातील विभागीय कार्यालय प्रमुखापर्यंत
प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.